सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या राज्य वार्षिक कृती आराखड्यापोटी <u>महानगरपालिकांना</u> केंद्र शासनाच्या पहिल्या हप्त्याच्या अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्र. अमृत-२०१६/प्र.क्र.०२ (१)/नवि-३३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक- ०४ जानेवारी, २०१६.

<u>संदर्भ:-</u>

१. अमृत अभियानाचा शासन निर्णय क्र. अमृत-२०१५/प्र.क्र १९७/नवि-३३, दि १३/१०/२०१५

२. केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाचे आदेश क्रमांक के-१४०१२/१५६/२०१५-एस.सी.-२, दिनांक- २२/१२/२०१५.

<u>प्रस्तावना:-</u>

नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारात घेऊन एक लक्षपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यातील ४३ शहरांमध्ये पायाभूत सुविधांचा स्तर उंचावण्याच्या अनुषंगाने अमृत अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ४३ शहरामध्ये करण्यात येणार आहे.त्याअनुषंगाने केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने राज्य शासनाने सादर केलेल्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या रु.२०२०.४६ कोटी किंमतीच्या राज्य वार्षिक कृती आराखडयास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे.

केंद्र शासनाने राज्य वार्षिक कृती आराखड्यास दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदर राज्य वार्षिक कृती आराखड्यापोटी केंद्र शासन हिश्याचा प्रथम हप्त्याचा निधी संदर्भाधीन क्र.२ येथील आदेशान्वये राज्य शासनास वितरीत केलेला आहे.

उक्त योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व त्यानुसार निश्चित केलेल्या वित्तिय आकृतीबंधानुसार शासनास प्राप्त झालेला केंद्र हिश्याचा निधी संबंधित <u>**महानगरपालिकांना**</u> वितरीत करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर राज्य वार्षिक कृती आराखड्यातील महानगरपालिकांच्या प्रकल्पांसाठी केंद्र शासन हिश्याचा पहिल्या हप्त्याचा निधी संबंधित महानगरपालिकांना खालील तक्त्यात रकाना क्र. ०७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रूपये कोटीत)

अ. क्र	नागरी स्थानिक स्वराज संस्था	जिल्हा	प्रकल्पाचे नाव	प्रकल्प किंमत रु.कोटी	केंद्र शासन हिस्सा रु.कोटी (लोकसंख्येनुसार ३३ ते ५० टक्के)	केंद्र शासनाने वितरीत केलेला प्रथम हप्त्याचा निधी रु.कोटी
१	२	३	४	५	६	७
१	वसई विरार	पालघर	पाणीपुरवठा	१३०	४३.३३	८.६६
			सौरउर्जा	५.७५	१.९२	०.३८
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२	उल्हासनगर	ठाणे	भुयारी गटार	२२३.१०	१११.५५	२२.३१
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
३	भिवंडी	ठाणे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
४	मिरा-भाईंदर	ठाणे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
५	ठाणे	ठाणे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
६	नवी-मुंबई	ठाणे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
७	कल्याण-डोंबिवली	ठाणे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
८	पुणे	पुणे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
९	पिंपरी चिंचवड	पुणे	पाणीपुरवठा	१२०.००	४०.००	८.००
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१०	सोलापूर	सोलापूर	पाणीपुरवठा	६६.९०	३३.४५	६.६९
			सौरउर्जा	१४.३८	७.१९	१.४४
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
११	जळगाव	जळगाव	पाणीपुरवठा	१२४.३५	६२.१७	१२.४३
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१२	नाशिक	नाशिक	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१३	मालेगाव	नाशिक	पाणीपुरवठा	४९.७५	२४.८७	४.९७
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१४	अहमदनगर	अहमदनगर	पाणीपुरवठा	१४९	७४.५०	१४.९०
			सौरउर्जा	२८.७५	१४.३७	२.८८
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१५	लातूर	लातूर	पाणीपुरवठा	६०.००	३०.००	६.००
			सौरउर्जा	८.६३	४.३१	०.८६
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१६	अमरावती	अमरावती	पाणीपुरवठा	८५.००	४२.५०	८.५०
			सौरउर्जा	११.५०	५.७५	१.१५
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०

अ. क्र	नागरी स्थानिक स्वराज संस्था	जिल्हा	प्रकल्पाचे नाव	प्रकल्प किंमत रु.कोटी	केंद्र शासन हिस्सा रु.कोटी (लोकसंख्येनुसार ३३ ते ५० टक्के)	केंद्र शासनाने वितरीत केलेला प्रथम हप्त्याचा निधी रु.कोटी
१	२	३	४	५	६	७
१७	अकोला	अकोला	पाणीपुरवठा	९१.८८	४५.९४	९.१९
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१८	नागपूर	नागपूर	पाणीपुरवठा	२२३.००	७४.३३	१४.८७
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
१९	चंद्रपूर	चंद्रपूर	पाणीपुरवठा	१००.००	५०.००	१०.००
			बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२०	परभणी	परभणी	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२१	नांदेड-वाघाळा	नांदेड	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२२	धुळे	धुळे	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२३	औरंगाबाद	औरंगाबाद	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२४	कोल्हापूर	कोल्हापूर	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
२५	सांगली-मिरज	सांगली	बगीचा/ग्रीन स्पेसेस	१.००	०.५०	०.१०
एकूण (महानगरपालिका)				**१५१६.९९**	**६७८.६८**	**१३५.७३**

०२. सदर निधी वितरणासाठी संबंधित जिल्हयाचे **जिल्हाधिकारी** यांना **नियंत्रक अधिकारी म्हणून** म्हणून घोषित करण्यात येत आहे.जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीबाबतचे देयक कोषागार कार्यालयात सादर करून संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्त यांच्या नावाने उपरोक्त विवरणपत्रामध्ये दर्शविल्यानुसार विहित कार्यपध्दतीनुसार तात्काळ वितरीत करणेबाबत आवश्यक कार्यवाही करून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

०३. उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने खालील अटींचे पालन करणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेवर बंधनकारक राहील.

अ. संबंधितमहानगरपालिकांनी अमृत अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांसाठीचा निधी प्रकल्पनिहाय स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये जमा करून त्यानुसार कार्यवाही करावी.

ब. अमृत अभियानांतर्गत सदर वितरीत केलेला निधी हा राज्यस्तरीय तांत्रिक मान्यता समितीने प्रकल्पास मान्यता दिल्यानंतरच फक्त अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी वापरण्यात यावा.

क. सदर निधी प्रकल्पाव्यतिरिक्त इतर बाबींवरील खर्चासाठी वापरता येणार नाही व तसे झाल्यास ही आर्थिक अनियमितता मानली जाईल.अशा अनियमिततेसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त पूर्णपणे जबाबदार राहतील.

ड. उपरोक्त अटीव्यतिरीक्त अन्य अटी संबंधित प्रकल्पास समितीमार्फत तांत्रिक मान्यता देताना विहीत करण्यात येतील.

०४. उपरोक्त विवरणपत्रामध्ये नमूद अनुदान **रूपये १३५,७३,००,०००/- (रूपये एकशे पस्तीस कोटी त्र्याहत्तर लक्ष)** इतक्या रक्कमेचा खर्च हा नगर विकास विभाग- मागणी क्रमांक एफ-२, २२१७, नगर विकास, केंद्र सहाय्यीत योजना (००)(८३) अमृत अभियानांतर्गत महानगरपालिकांना सहाय्य (केंद्र हिस्सा) (२२१७९८६८), ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर), दत्तमत, १९१- महानगरपालिकांना सहाय्य या लेखशिर्षामधून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

०५. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५/प्रक्र८५/अर्थ-३,दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागाच्या स्तरावरून निधी वितरीत करण्यास देण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११११५३३४१३२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sanjay Sharadchandra Gokhale

Digitally signed by Sanjay Sharadchandra Gokhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay Sharadchandra Gokhale
Date: 2016.01.11 15:35:17 +05'30'

(सं.श.गोखले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिव
२. मा.विरोधी पक्ष नेते,महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
३. मा.विरोधी पक्ष नेते,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. अधिदान व लेखाधिकारी, फोर्ट, मुंबई
९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव, वित्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

११.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

१२.विभागीय आयुक्त कोकण,नाशिक,पुणे,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

१३.जिल्हाधिकारी ठाणे, पुणे, सोलापूर, जळगाव, नाशिक, अहमदनगर, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर,परभणी,नांदेड,धुळे,औरंगाबाद,कोल्हापूर व सांगली

१४.उप सचिव (नवि-४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१५.उप सचिव (नवि-५), रोख शाखा, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१६.आयुक्त ठाणे, वसई-विरार,उल्हासनगर, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, नवी-मुंबई,पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, मालेगाव ,जळगाव, नाशिक, अहमदनगर, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर, परभणी, नांदेड, धुळे, औरंगाबाद, कोल्हापूर व सांगली महानगरपालिका.

१७.जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे, पुणे, सोलापूर, जळगाव, नाशिक, अहमदनगर, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर,परभणी,नांदेड,धुळे,औरंगाबाद,कोल्हापूर व सांगलीजिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.

१८. जिल्हा कोषागार अधिकारीठाणे, पुणे, सोलापूर, जळगाव, नाशिक, अहमदनगर, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर,परभणी,नांदेड,धुळे,औरंगाबाद,कोल्हापूर व सांगली

१९.निवडनस्ती, नवि-३३.